वाचलेः- १)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय,भोसरी यांच्याकडील दि.१३/०४/२०२२ चे पत्र
४)दि.०५/०५/२०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/२०९/२०२२
दि.०५/०५/२०२२

विषय –नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.
**श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक)**
**सं.क्र. ७८८८**

आदेश,

श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.०३/१०/१९९६ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेल्या आहेत. श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांची जन्म तारीख ०१/०६/१९६४ अशी असून त्यांच्या वयास दिनांक-३१/०५/२०२२ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांना ३१/०५/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.

तसेच श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत दि.०३/१०/१९९६ ते दि.११/०४/२००० अखेर सेवासातत्य देण्यात आलेले असून सदर कालावधीचा फरक र.रू.२,८५,२६४/- (अक्षरी-दोन लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चौसष्ट फक्त) श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करणेत आलेले आहे.

तथापि,मा.आयुक्त सो.यांच्याकडील आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि.१८/१२/२००७ अन्वये दिलेल्या सेवासातत्य व फरकावरील रक्कमेस लेखापरिक्षण विभागाने आक्षेप घेतलेले आहेत.त्यानुसार माध्यमिक शिक्षण विभागाने र.रू.२,८५,२६४/- वसुल करणेबाबत श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांना पत्र बजावणेत आलेले असल्याने श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्याकडे याचिका क्र.३८२३/२०२१ दाखल केलेली आहे.

सबब,मी उप आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्रीम.शोभा बाबासाहेब पाटील, सहाय्यक शिक्षक **यांना दिनांक - ३१/०५/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक) यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम.शोभा बाळासाहेब पाटील (सहाय्यक शिक्षक)
माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विद्यालय भोसरी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(रोहिणी शिंदे)
प्रशासन अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८.